# महाराष्ट्र शासन

## अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद
## कार्यकारी अभियंता, उस्मानाबाद मध्यम प्रकल्प विभाग, उस्मानाबाद

**Email ID : ee_ompdosbad@rediffmail.com**
**Phone No ०२४७२ २२७२९३**

**सेवानिवृत्त शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता व मंडळ अधिकारी / नायब तहसिलदार यांच्या सेवा करार पध्दतीने विविक्षीत करणे बाबत.**

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७७५/प्र.क्र.१००/१३ मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय मुंबई ४०० ०३२ दिनांक १७ डिसेंबर, २०१६ अनुसार दिलेल्या निर्देशानुसार खालील संवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी यांची सेवा करार पध्दतीने अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद या मंडळांतर्गत अधिनस्त विभागीय कार्यालामध्ये विविक्षीत कामासाठी नेमणूक करावयाची आहे.

| अ.क्र. | संवर्ग | पद संख्या |
|---|---|---|
| १ | शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता | ०३ |
| २ | मंडळ अधिकारी / नायब तहसिलदार | ०२ |

जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांची नेमणूक कंत्राटी पध्दतीने ११ महिन्यांसाठी करावयाची आहे. सेवानिवृत्त शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता यांना भुसंपादन व न्यायालयीन कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक आहे. तसेच सेवानिवृत्त मंडळ अधिकारी / नायब तहसिलदार यांना विशेष भुसंपादन अधिकारी यांच्याकडील नवीन दाखल होणारे दावे, भूसंदर्भ प्रकरणांची माहिती संकलित करणे, विशेष भूसंपादन अधिकारी यांच्याकडील कलम-२८ च्या प्रकरणे बाबत कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक आहे. ईच्छुक अर्जदारांनी विहीत नमुन्यातील अर्ज कार्यकारी अभियंता, उस्मानाबद मध्यम प्रकल्प विभाग, उस्मानाबाद यांच्याकडे दिनांक ०९/०३/२०२२ ते २१/०३/२०२२ पर्यंत (सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत) प्राप्त होतील अशा बेताने पोस्टाव्दारे किंवा प्रत्यक्ष सादर करावीत. अर्जाचे पाकीटावर “सेवानिवृत्त शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता यांची कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करण्याबाबत”, "सेवानिवृत्त मंडळ अधिकारी / नायब तहसिलदार यांची कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करण्याबाबत” असे स्पष्ट लिहीण्यात यावे. नियोजीत दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यांत येणार नाही. सदर नेमणूका समितीव्दारे मुलाखती घेऊन करण्यांत येतील. सदर नेमणूकांचे आदेश हे योग्य स्तरावर अंतीम मान्यतेनंतर निर्गमीत करण्यांत येतील.

### सेवा करार पध्दतीवर भरावयाच्या पदांचा तपशिल खालील प्रमाणे

| अ. क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचा तपशिल | खालील पदावरुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी / कर्मचारी सदर पदांकरीता अर्ज करण्यास पात्र आहे. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता | क्षेत्रीय स्तरावरील भुसंपादन व न्यायालयीन कामकाजाचा अनुभव | शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता |

| अ. क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचा तपशिल | **खालील पदावरुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी / कर्मचारी सदर पदांकरीता अर्ज करण्यास पात्र आहे.** |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २ | मंडळ अधिकारी / नायब तहसिलदार | विशेष भुसंपादन अधिकारी यांच्याकडील नवीन दाखल होणारे दावे, भूसंदर्भ प्रकरणांची माहिती संकलित करणे, विशेष भूसंपादन अधिकारी यांच्याकडील कलम-२८ च्या प्रकरणे बाबत कामकाजाचा अनुभव | मंडळ अधिकारी / नायब तहसिलदार |

सदर नेमणूकीकरीता लागु असलेल्या अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना हा महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या ई-जलसेवा या वेबसाईट http://wrd.maharashtra.gov.in वर उपलब्ध आहे. तसेच हा अर्ज व अटी / शर्ती कार्यकारी अभियंता, उस्मानाबाद मध्यम प्रकल्प विभाग, उस्मानाबाद या कार्यालयात उपलब्ध आहे.

## सदर नेमणुका या खालील सर्वसाधारण शर्ती व अटीच्या अधिन राहतील

१) अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी ज्या पदासाठी अर्ज केले आहे. त्या पदाचा विवक्षीत कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

२) सदर नेमणूक एक वर्षासाठीच राहील. एक वर्षापेक्षा जास्त वाढविण्याची आवश्यकता भासल्यास संबंधीतांचे कामकाज व आवश्यकता पाहून नियुक्ती अधिकारी तसा निर्णय घेऊ शकतात.

३) सेवा करार पध्दतीने नियुक्त सेवा निवृत्त अधिकारी यांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय मुंबई ४०० ०३२ दिनांक १७/१२/२०१६ मधील अटी व शर्तीप्रमाणे शासन निर्णयासोबत असलेल्या परिशिष्ट-अ नुसार मासिक परिश्रमीक म्हणुन त्यांना अनुज्ञेय राहील.

४) करारपध्दतीने नियुक्ती देण्यांत आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही विभागात / संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचा इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार नसेल या बाबत अर्जदाराने रु १००/- च्या मुद्रांकावर प्रतिज्ञालेख देण्यांत यावा.

५) करार पध्दतीवर नियुक्त करण्यात येणा-या (व्यक्ती) अधिकारी त्यांच्या वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहु शकतील.

६) अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांची शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याबाबत जिल्हा शल्यचिकीत्सक अधिका-याचे मुळ प्रमाणपत्र द्यावे लागेल.

७) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमणूक दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र / हमीपत्र अटी व शर्ती संबंधीत उमेदवाराला मान्य आहेत या बाबत बंधपत्र उमेदवारास रु १००/- च्या मुद्रांकावर देणे बंधनकारक राहील.

८) अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी विरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण नसावे याबाबत अर्जदारांनी ज्या कार्यालयातुन सेवानिवृत्त झाले आहे. त्या संबंधीत कार्यालयाकडुन तसे प्रमाणपत्र प्राप्त करुन सादर करणे बंधनकारक आहे.

९) नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील त्याबाबतची कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

१०) सदर अधिकारी / कर्मचारी त्यांच्यावर सोपविलेल्या पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही कामात गुंतलेला नसावा.

११) अशा अधिकारी / कर्मचारी यांना conflict of interest जाहीर करणे आवश्यक राहील.

१२) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

१३) अशा करार पध्दतीवरील अधिकारी / कर्मचारी यांना त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे / माहिती, कामाबाबत व आधारसामुग्री बाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.

१४)नियुक्ती अधिकारी यांना त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणेआवश्यक राहील. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमुन दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता सेवा समाप्त करण्यांत येईल.

१५) अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांच्या सेवेच्या शेवटच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी संबंधीत कार्यालयाकडुन प्रमाणीत करुन तसे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच प्रशस्तीपत्र / नैपुण्यपुर्वक काम केले असल्यास तेस प्रमाणपत्र अर्जासोबत जोडण्यात यावे.

१६) क्षेत्रिय स्तरावर करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवाकाळामध्ये काही नैसर्गीक अपघात व काही आजार उध्दवभल्यास कार्यालय / शासन बांधील राहणार नाही.

१७) अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांचे कुटूंब निवृत्तीवेतन मंजूरीचे महालेखापाल कार्यालयाचे दस्तऐवज सादर करणे आवश्यक आहे.

१८) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमीत झालेल्या दिनांकापासुन १५ दिवसाचे आत रुजु होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१९) मुलाखातीकरीता पात्र उमेदवारांना पत्र ई-मेलव्दारे पाठविण्यांत येईल व भ्रमणध्वनीव्दारे लघुसंदेशाव्दारे कळविण्यांत येईल. यास्तव अर्जदारांनी आपल्या वैयक्तीक माहितीत त्यांचा ई-मेल पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक देणे बंधनकारक आहे. तसेच मुलाखातीसाठी पात्र उमेदवारांची यादी कार्यकारी अभियंता, उस्मानाबाद मध्यम प्रकल्प विभाग, उस्मानाबाद यांच्या सुचना फलकावर शक्य झाल्यास दिनांक २३/०३/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यांत येईल. व अंतिम निवड झालेल्या अर्जदारांची यादी वरील कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यांत येईल तसेच वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत येईल. तसेच अंतीम निवड झालेल्या अर्जदारांना वैयक्तीक ई-मेलव्दारे कळविण्यांत येईल.

२०) सदर नियुक्ती क्षेत्रिय स्थळावर संबंधीत विवक्षीत कामासाठी करण्यांत येत असून त्यासाठी योग्य उमेदवार न भेटल्यास काही किंवा सर्व पदे रिक्त ठेवण्याचा अधिकार समितीस आहे.

२१) करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणा-या अधिका-यांस / कर्मचा-यास कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाहीत.

२२) उपरोक्त अटी व शर्ती व्यतिरिक्त शासन / नियुक्ती अधिकारी / कर्मचारी वेळोवेळी ठरवतील त्या अटी व शर्ती अंतीम राहतील.

कार्यकारी अभियंता,
उस्मानाबाद मध्यम प्रकल्प विभाग,
उस्मानाबाद

E:\EST5\letters\New folder\OMP\New folder\14 12 2021.docx

# विहित नमुन्यातील अर्ज
## सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामांसाठी सेवानिवृत्त अभियंता व मंडळ अधिकारी / नायब तहसिलदार यांची नेमणूक करार पध्दतीने घेणेबाबतचा अर्ज

| उमेदवाराने अलिकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे |
|---|

प्रति,

मा. कार्यकारी अभियंता,
उस्मानाबाद मध्यम प्रकल्प विभाग,
उस्मानाबाद

**अर्ज केलेल्या पदाचे नांव :- ---------------------------------------**

१. अर्जदाराचे नांव :-
२. कायमचा पत्ता :-
३. दुरध्वनी क्र (अनिवार्य) :-
४. ई-मेल (अनिवार्य) :-
५. सध्याचा पत्ता :-
६. जन्म दिनांक :-
७. राष्ट्रीयत्व :-
८. प्रवर्ग :-
९. लिंग :- ( पुरुष / महिला )
१०. अवगत भाषा :-
११. शैक्षणिक माहिती :-

| अ.क्र. | परिक्षा | वर्ष | शाळा / कॉलेजचे नांव | बोर्ड / विद्यापिठ | मिळालेल्या गुणाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |

१२. इतर शैक्षणिक माहिती ( संगणक इत्यादी )

| अ.क्र. | अभ्यासक्रम | वर्ष | संस्थेचे ( प्रायोजक) नांव | मिळालेल्या गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |

१३. अनुभव :-

| अ.क्र. | हुद्दा व वेतन | कार्यालयाचे नाव व पत्ता | कालावधी | कामाचा अनुभव (विस्तृत स्वरुपात) |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |

१४. सेवानिवृत्तीचा दिनांक :-

१५. या मंडळा अंतर्गत ज्या ठिकाणी काम करण्याची ईच्छा आहे असे प्राधान्याचे ठिकाण अथवा कोठेही काम करण्यास तयार असल्यास तसे स्पष्टपणे नमुद करावे.

१६. सद्य:स्थितीत कुठे काम करीत असल्यास तपशिल :-

मला पुर्णपणे माहिती आहे की, पायाभुत सुविधा निर्मिती एमपॅनलमेंट व्दारे प्रकल्पाचे क्षेत्रिय व कार्यालयीन कामाकरीता सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता व मंडळ अधिकारी / नायब तसहीलदार या पदासाठी उमेदवारांची नियुक्ती करण्यात येणार आहे. सदर पदे प्रकल्पाचे क्षेत्रिय कार्यालयीन कामासाठी आहेत व कामाचे व्याप्ती प्रमाणे कमी / अधिक करण्यात येतील. कामाच्या निकडीनुसार जिल्हयातील कोणत्याही तालुक्यात व प्रदेश कार्यालयाअंतर्गत कोठेही माझी काम करण्याची तयारी आहे.

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, माझी माहिती प्रमाणे वर दिलेल्या तपशिल सत्य व अचुक आहे. यामध्ये काही चुकीची माहिती आढल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पुर्व सुचने शिवाय रद्द होईल व मी शिक्षेस पात्र ठरेल याची माला पुर्ण जाणिव आहे.

ठिकाण :- अर्जदाराचे नाव व स्वाक्षरीत

दिनाक :-